MHSO060020792023

**नियमित दिवाणी दावा क्र. ९१/ २०२३**

*CNR No. MHSO060020792023*

अभिजीत सावंजी

*वि.*

जिल्हाधिकारी, सोलापूर व इतर

**निशाणी क्र. १, ३० आणि ३२ वरील आदेश**

निशाणी क्र. ३० वरील आदेशाच्या अनुषंगाने वादीने निशाणी क्र. ३९ प्रमाणे त्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादीची विद्युत जोडणी अद्यापही सुरु आहे, खंडीत केलेली नाही. सदरील बाबीचे खंडन करण्यासाठी प्रतिवादी क्र. ३ अथवा त्याचे विधीज्ञ दुपारी ०४.३० पर्यंत देखील हजर झालेले नाहीत. सबब, प्रतिवादी क्र. ३ याने दिलेला वादपत्र खारीज करण्याचा अर्ज, त्यास वादीचे वतीने मागण्यात आलेली तोंडी तारीख, प्रतिवादी क्र. ३ चा त्यांचे म्हणणे देण्यास अवधी मिळण्याचा अर्ज व वादीचा जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा अर्ज या अनुषंगाने विवेचन करणे आवश्यक आहे.

०२. प्रतिवादीने निशाणी क्र. ३१ वरील अर्जाच्या अनुषंगाने, जर प्रतिवादी क्र. ३ यास घाई असती तर, सदरील अर्ज चालविण्यासाठी न्यायालयासमोर हजर होऊन युक्तीवाद करणे आवश्यक होते. त्यावर या प्रतिवादीचा कायदेशीर मुद्यावर तसेच वादीच्या वतीने मांडलेले तोंडी म्हणणे विचारात घेऊन योग्य तो आदेश पारीत करता येऊ शकला असता. तथापि, प्रतिवादी क्र. ३ तर्फे याक्षणी सदरील अर्ज चालविण्यासाठी कोणीही हजर नसल्याने तो ताबडतोब निकाली काढता येऊ शकत नाही. परीणामी प्रतिवादी क्र. ३ चा मुदतीचा अर्ज विचारात घ्यावा लागेल. प्रतिवादी क्र. ३ यास कोणत्याही कारणाने विद्युत जोडणी तोडण्याची घाई असती तर प्रतिवादी क्र. ३ याने म्हणणे मांडण्यासाठी मुदत मागितली नसती. तथापि, उपरोक्त बाब पहाता तसेच निशाणी क्र. ३० वर केलेल्या

आदेशातील निरीक्षण पहाता प्रतिवादी क्र. ३ यास घाई नसल्याचे दिसते. वादीची विद्युत जोडणी तोडली असती तर निशाणी क्र. ३० वरील अर्जात अथवा निशाणी क्र. ३१ वरील अर्जात तशी बाब प्रतिवादी क्र. ३ नमूद करु शकले असते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ चा निशाणी क्र. ३१ वरील अर्ज व वादीचा निशाणी क्र. ५ वरील अर्ज निर्णित करण्यास कालावधी लागेल असे वाटते. सबब, वादीची निशाणी क्र. ३२ वरील अर्जातील विनंती विचारात घेणे आवश्यक आहे.

०३. वादीने निशाणी क्र. ५ चे निर्णयापर्यंत त्याची विद्युत जोडणी तोडण्यास स्थगिती मागितलेली आहे. वादी हा विद्युत जोडणीबाबत आहे ती परिस्थिती ठेवण्याची विनंती करतो. वादीने विद्युत जोडणी खंडीत नसल्याचे प्रतिज्ञापत्र दिले आहे. सबब, उपरोक्त सर्व बाब पहाता पुढील तारखेपर्यंत वादीच्या प्रतिज्ञापत्राच्या अनुषंगाने विद्युत जोडणी बाबत आहे ती परिस्थिती ठेवल्यास प्रतिवादीचे नुकसान होईल असे वाटत नाही. सोबतच वादीला देखील निर्देश देणे आवश्यक ठरते की, वादीने देखील निशाणी क्र. ३१ वरील अर्जाच्या अनुषंगाने त्याचे म्हणणे पुढील तारखेपर्यंत मांडणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांनी आपापली जबाबदारी पार पाडल्यास गुणवत्तेवर आदेश पारीत करणे सोपे होईल. याक्षणी वादींना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३ प्रमाणे आदेशाची प्रतिवादी क्र. ३ वर बजावणी करण्याचे निर्देश देणे योग्य वाटते. सदरील नियमाप्रमाणे जरी एकतर्फा आदेश पारीत करीत असताना अशाप्रकारे कार्य करणे आवश्यक असले तरी या प्रकरणात याक्षणी प्रतिवादी क्र. ३ व त्याचे विधीज्ञ हजर नसल्याने व त्यांनी वादपत्र खारीज करावे असा अर्ज दिल्याने तो देखील गुणवत्तेवर चालावा याकरीता असे निर्देश वादीस देणे या न्यायालयाला योग्य वाटते. सबब, उपरोक्त विवेचनाच्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

अ. प्रतिवादी क्र. ३ याने वादीच्या विद्युत जोडणीबाबत वादीच्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे आहे ती परिस्थिती दिनांक २७.१०.२०२३ पर्यंत कायम ठेवावी.

ब. वादीने न चुकता प्रतिवादीच्या निशाणी क्र. ३१ वरील अर्जास पुढील तारखेस म्हणणे सादर करावे.

क. प्रतिवादी क्र. ३ याने देखील स्वतः न्यायालयासमोर हजर होऊन त्याची कैफियत व म्हणणे दिनांक २७.१०.२०२३ रोजी दाखल करुन युक्तीवाद करावा.

ड. प्रतिवादी क्र. २ तर्फे आजही विधीज्ञ निशाणी क्र. ५ वरील युक्तीवादास तयार असल्याने वादी व प्रतिवादी क्र. ३ यांनी देखील न चुकता पुढील तारखेस निशाणी क्र. ५ व निशाणी क्र. ३१ वर युक्तीवाद करावा.

इ. प्रतिवादी क्र. ३ व त्याचे विधीज्ञ हजर नसल्याने वादीने या आदेशाची अंमलबजावणी प्रतिवादी क्र. ३ वर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३ प्रमाणे करावी, जेणेकरुन प्रतिवादी क्र. ३ यास या आदेशातील विवेचनाचे व आदेशाचे ज्ञान होऊन तो पुढील तारखेस न्यायालयात हजर राहील.

NILESH SUBHASH BUDRUK
Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2023.10.20 17:06:06 +0530

दि. २०.१०.२०२३

( नीलेश सु. बुद्रुक )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar, Grade – II |
| Name of the Court | : | $2^{nd}$ Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 20/10/2023 |
| Order uploaded on | : | 20/10/2023 |